| | |
|---|---|
| स्वीकारल्याचा दिनांक | – ०६.०९.२०२२. |
| नोंदणी दिनांक | – ०६.०९.२०२२. |
| निकाल दिनांक | – ०९.१०.२०२४. |
| कालावधी | –२व. १म. ३दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारीः- अरुण र. व्यवहारे)**

**नियमित फौजदारी खटला क्र.९६/२०२२.** **निशाणी क्रमांकः–२३**

CNR NO. MHSN070008292022

महाराष्ट्र शासन,
मार्फत कवठेमहांकाळ पोलीस ठाणे,
कवठेमहांकाळ , जिल्हा सांगली. **...अभियोगपक्ष**

**विरुध्द**

संदीप वसंत भोसले,
वयः–४० वर्षे,
राहणार रोहिदासनगर, ता. कवठेमहांकाळ. **...आरोपी**

---

अभियोगपक्षातर्फे – सहाय्यक सरकारी अभियोक्ता.श्री एस.एच.जाधव.
आरोपीतर्फे – विधीज्ञ श्री.पी.ए.पाटील.

---

## न्यायनिर्णय

**(दिनांकः– ०९.१०.२०२४ रोजी पारित केला)**

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे

कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये दोषारोप ठेवुन चालविण्यात आला आहे.

**<u>अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

०२. फिर्यादी वसंत बापू भोसले यांनी फिर्याद दिली की, ते रोहिदासनगर, कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ येथे त्यांची पत्नी, मुलगा, सुन व नातवंडे यांच्यासह राहतात. त्यांचा मुलगा संदीप हा दारुचा व्यसनी असून तो दारु पिवून त्यांचेबरोबर अधूनमधून भांडणतंटा करीत असतो.

०३. दि.१७.०६.२०२२ रोजी सायंकाळी ७.०० वाजताचे सुमारास त्यांची सून दिपा संदीप भोसले हिला आरोपी संदीप याने दारु पिवून येवून ' तू मला पैसे का देत नाही' असे म्हणून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यामुळे सून घरातून निघून गेली. त्याबाबत फिर्यादी यांनी आरोपीस 'तू दिपाला का मारलेस' असे विचारले असता त्याने फिर्यादीस 'तुम्हाला काय करायचे' असे म्हणून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीची पत्नी छाया हिने आरोपी संदीप यास 'तू वडिलांना मारहाण करु नको' असे म्हणताच आरोपी संदीपने फिर्यादीची पत्नी छाया हिला डाव्या हातावर काठीने मारुन जखमी केले. फिर्यादी पोलीस ठाण्यात गेला असता पोलिसांनी त्यास वैदयकीय यादी देवून उपजिल्हा रुग्णालय कवठेमहांकाळ येथे उपचाराकरीता पाठविले. उपचार घेतल्यानंतर फिर्यादीने कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

०४. फिर्यादीच्या उक्त फिर्यादवरुन दिनांक १८.०६.२०२२ रोजी, पोलीस ठाणे कवठेमहांकाळ येथे गुन्हा क्रमांक २४२/२०२२ अन्वये नोंदविण्यात आला व त्याचा तपास पोलीस नाईक श्री.सुहास दशरथ मोहिते यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदवले, जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, घटनास्थळ व मुददेमाल जप्तीचा पंचनामा केला. तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीस दोषारोप (नि.क्र.१३) त्याच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता त्याने गुन्हा कबूल

नसल्याचे सांगितले व खटल्यास सामोरे जाण्याची इच्छा व्यक्त केली.

०५. आरोपी व फिर्यादी यांच्यात समझोता झाल्याबद्दल तडजोड अर्ज व तडजोड पुरसीस नि. क्र. १७ व १८ वर दाखल करण्यात आले आहे. गुन्हा तडजोडपात्र नसल्यामुळे सदर तडजोड नामंजुर करण्यात आली. अभियोग पक्षातर्फे एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. फिर्यादीने निशाणी २१ वर त्यांना जादा तोंडी पुरावा देण्याचा नसलेबाबत अभिलेखावर पुरसीस दाखल केली. आरोपीविरुध्द आक्षेपार्ह पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ख) अन्वयेचे बयाण नोंदविण्यात आले नाही.

०६ सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.एच.जाधव व आरोपीचे विधिज्ञ श्री.पी.ए.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

०७. अभिलेखावरील पुरावा पाहता आणि दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकता खालील विचाराधीन बाबी माझ्या विचारार्थ आल्या असुन त्यावरील निष्कर्ष व कारणे खालीलप्रमाणे देण्यात येतात –

| अ.क्र | विचाराधीन बाबी | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, दिनांक १७.०६.२०२२ रोजी रात्री १०.३० वाजताचे सुमारास कवठेमहांकाळ येथे फिर्यादीच्या घरी आरोपीने फिर्यादी व त्याच्या पत्नीस काठी सारख्या घातक हत्याराने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली? | : | नकारार्थी |
| २. | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी व तिच्या पत्नीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली ? | : | नकारार्थी. |
| ३. | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, वर नमुद | : | नकारार्थी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यायोगे त्याला प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे त्याच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असे कृत्य केले ? | | |
| ४. | अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून धाकधपटशाचा अपराध केला? | | नकारार्थी. |
| ५. | आदेश कोणता? | : | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**विचाराधीन बाबी क्र. १ ते ४ बाबतः–**

८. सदर विचाराधीन बाबी हया एकमेकाशी संलग्न असल्यामुळे व आलेला पुरावा लक्षात घेता पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रीत कारणेमिमांसेकरिता घेण्यात येतात.

९. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले आहेत. साक्षीदार क्र.१ फिर्यादी वसंत बापू भोसले यांची साक्ष नि.क्र.१९ वर व सा.क्र.२ छाया वसंत भोसले यांची साक्ष नि.क्र.२० वर नोंदवण्यात आलेली आहे. आरोपी व फिर्यादीमध्ये समझोता झाल्याबाबत अर्ज व तडजोडपत्र नि.क्र.१७ व नि.क्र.१८ वर दाखल करण्यात आले आहे. परंतु कलम ३२४ हा गुन्हा तडजोड पात्र नसल्याने त्यांचा अर्ज नामंजुर करण्यात आला.

१०. स.सा.क्र.१ वसंत बापू भोसले यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, आरोपी संदीप हा त्यांचा मुलगा आहे. आरोपी व त्यांच्यामध्ये किरकोळ कारणांवरुन वादावादी झाली होती. त्यांनी घटनेबाबत फिर्याद दिल्याचे

मान्य केले आहे परंतु त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे सांगितले आहे. आरोपीने त्यांना व त्यांच्या पत्नीस काठीने मारहाण केल्याचे त्यांनी स्पष्टपणे नाकारले आहे.

११. स.सा.क्र.२ छाया वसंत भोसले यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, आरोपी संदीप हा त्यांचा मुलगा आहे. आरोपी व त्यांच्यामध्ये किरकोळ कारणांवरुन वादावादी झाली होती. आरोपीने त्यांना व त्यांच्या पतीस काठीने मारहाण केल्याचे त्यांनी स्पष्टपणे नाकारले आहे.

१२. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ वसंत (फिर्यादी), साक्षीदार क्र.२ छाया यांनी अभियोग पक्षाच्या बाजुने पुरावा दिलेला नाही. त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारांना भारतीय साक्षी पुरावा अधिनियम कलम १५४ प्रमाणे सुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोग पक्षाच्या बाजुने काही आले नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांची साक्ष ही अभियोग पक्षाच्या उपयोगाची नाही. उलट तशी मारहाण झाली नाही, असे सदर साक्षीदारांनी कथन केलेले आहे.

१३. प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी व जखमी साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या बाजुने साक्ष दिलेली नाही. फिर्यादी व साक्षीदार यांनी त्यांना मारहाण झाल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. त्यामुळे वैदयकीय अधिकारी अथवा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवून काहीही उपयोग झाला नसता. तसेच फिर्यादीने इतर साक्षीदार तपासावयाचे नसल्याबाबत अभीलेखावर निशाणी क्र. २१ अन्वये पुरसीस दाखल केलेली आहे. वर नमुद केल्याप्रमाणे आरोपीने फिर्यादी व साक्षीदारांस काठी व लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली, शिवीगाळी केली व जीवे मारण्याची धमकी दिली, याबाबत कोणताही पुरावा अभियोग पक्ष देवु शकलेला नाही. वरील सर्व बाबी लक्षात घेता मी या निष्कर्षाप्रत येतो की, आरोपीवरील आरोप अभियोग पक्ष सबळ पुराव्या अभावी सिध्द करु शकलेला नाही. त्यामुळे आरोपी संशयाच्या फायदयासह निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील विवेचनावरुन विचाराधीन बाब क्र. १ ते ४ वरील निष्कर्ष मी "नकारार्थी" नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन बाब क्र. ५ बाबतः–</u>**

१४. विचाराधीन बाब क्र. १ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. प्रस्तुतच्या गुन्ह्यामध्ये एक काठी जप्त करण्यात आली आहे. सदरच्या काठीस मूल्य नसल्याने ती काठी अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करणे उचित होईल. वरील विवेचनावरुन विचाराधीन बाब क्रमांक ५ करिता मी खालील आदेश पारित करीत आहे–

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.१ संदीप वसंत भोसले राहणार रोहिदासनगर, कवठेमहांकाळ, तालुका कवठेमहांकाळ, जि.सांगली याची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ च्या गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र व जमानतपत्र रद्द करण्यात येते.

३. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल एक काठी अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ च्या अनुपालनाकरिता आरोपीने रक्कम रुपये पंधरा हजार रुपयांचे बंधपत्र आणि जमानतपत्र दयावे.

५. न्यायनिर्णयाची प्रत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३६५ अन्वये जिल्हा दंडाधिकारी, सांगली यांना पाठवण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारित व घोषित करण्यात आला.)

ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2024.10.10 07:50:30 +0530

ठिकाणः– कवठेमहांकाळ. **(अरुण र. व्यवहारे)**

दिनांकः– ०९.१०.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment is same, word to word, as per the original judgment.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 09.10.2024
Order signed by the
Presiding Officer on -09.10.2024
**Order uploaded on -10**.10.2024